प्रेसनोट

दिनांक ०५/०९/२०२३

**आरोपी लोकसेवक विशाल बाबु हापटे, वय- ३५ वर्षे, पद - राज्य कर निरीक्षक, वर्ग ०२, जी.एस.टी. भवन, कोल्हापूर, रा. शिवाजी तालीम जवळ, जैन बस्ती, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांचे मित्राचे टायर्स विक्रीचे दुकान आहे. मित्राचे दुकानात जीएसटी अधीकारी हापटे आले व त्यांनी तक्रारदार यांचे मित्राकडे इनकमटॅक्स रिटर्न, बॅलेन्स सिट, सेल रजीस्टर व इतर कागदपत्रांची मागणी करून कागदपत्रे नसतील तर हे प्रकरण मिटविण्यासाठी ६,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांच्या मित्राकडे ६,०००/- रूपयांची मागणी केली आहे.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये. तक्रारदाराच्या मित्राने त्याच्या टायर्स विक्री दुकानाचा जी.एस.टी.भरला नाही म्हणुन कारवाई न करणेसाठी जी. एस.टी.अधिकारी हापटे यांनी तक्रारदाराकडे १०,०००/- मागणी केल्याचे निषन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन **आरोपी लोकसेवक विशाल बाबु हापटे, वय- ३५ वर्षे, पद - राज्य कर निरीक्षक वर्ग ०२, जी.एस.टी. भवन, कोल्हापूर** यांनी १०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना पकडणेत आले आहे.

सदरबांबत **आरोपी लोकसेवक विशाल बाबु हापटे, वय- ३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी , राज्य कर निरीक्षक, जी. एस.टी. भवन, कोल्हापूर** यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्री बापु साळुंके, पोलीस निरीक्षक, श्री संजिव बंबरगेकर, पो.ना. सुधीर पाटील, म.पो.ना.संगीता गावडे, पो.कॉ. मयुर देसाई, पो.कॉ.रूपेश माने, पो.कॉ. संदिप पवार, चा.पो.हे.कॉ. सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५
कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.